OIC

पे.का.मु.-४०,००० पु. (२५ x ६)-०८-२०१०-९ ३-वि (वाच) ३५६

FORM - 1A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर
## FIRST INFORMATION REPORT
फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1 राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station लो.प्र.वि. पहिली खबर क्र. FIR No. 13 वर्ष Year 2018 दिनांक Date 21/03/2018

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधि. 1988 कलमे Sections 7, 13(1)(D) सह 13(2)

(ii) अधिनियम Act ...... कलमे Sections ......

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना : वार शुक्रवार तारीख पासून 16/3/18 वेळ 17:42 तारीख पर्यंत 21/3/18 वेळ 15:10
Occurence of offence : Day Date from Time Date to Time

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)
3. (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेची Information received at P. S. तारीख Date 16/3/18 वेळ Time 15:30

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 30 तारीख Date 21/3/18 वेळ Time 15:55

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा उत्तरेस 6 किमी चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. ......
Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurence Name सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक, आस्थापना विभाग, ठिकाणाचे नंबर No. if any गल्ली Ward रस्त्याचे नाव Name of road
जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest Adentifiable Place एच/पूर्व, बृ.मु.म.न.पा. कार्यालय, गाव पोस्ट वाकोला, सांताक्रुज (पूर्व), तालुका जिल्हा मुंबई Dist. - 55 राज्य State

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ...... तालुका ...... जिल्हा ...... राज्य ......
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address

(a) नाव Name श्री संजय काळे (b) वडिलाचे / पतीचे नाव Father's / Husbands Name श्री. धनाजी काळे

(c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age 49 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9702642873

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ...... दिल्याचा दिनांक Date of Issue ...... दिल्याचे ठिकाण Place of Issue ...... (f) व्यवसाय Occupation ......

(g) धर्म Religion हिंदू जात Caste महार जनजात Sub-Caste

(h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. Address : Ward खोली घर/नाव नंबर House/Name No. 1212, 12 वा मजला फोन/मो. नंबर Phone/M. No. पॅन नं. Pan No. ओटर्स नं. Card No.
रस्त्याचे नाव Road शास्त्रीनगर को. ऑप. हौ. सोसा. जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place गाव Village पोस्ट Post पो.स्टे P. Stn.
वांद्रा (पू), मुंबई 400051
तालुका Taluka ...... जिल्हा Dist. ...... राज्य State ...... सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

प्रशांत नरसिंह किणी, वय - 41 वर्षे, मुख्य लिपिक
सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक, आस्थापना विभाग, एच/पूर्व,
बृ.मु.म.न.पा. कार्यालय, सांताक्रुज (पू), मुंबई - 55

77

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ पडताळणी करून त्वरित
Records for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मा.मत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.

..............................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ............ रु. 3,000/-
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties) रु. 2,500/-

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील अटक आरोपी लोकसेवकाने फिर्यादी यांच्याकडे त्यांचे वेतन निश्चिती प्रपत्र व वेतनवाढीबाबत कार्यवाही करण्याकरीता कायदेशीर पारिश्रमिकेशिवाय दि. 16/3/2018 रोजी रु. 3,000/- इतक्या रकमेची लाचेची मागणी करून दि. 21/3/2018 रोजी तडजोडीअंती रु. 2,500/- इतकी रक्कम लाच म्हणून स्विकारण्याचे मान्य करून स्विकारली म्हणून गुन्हा कलम 7, 13(1), (D) सह 13(2) भ्र.प्र. अधि. 1988 अन्वये गुन्हा दाखल

13. केलेली कार्यवाही .— 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ............ पो.नि. सीमा सकुंडे

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ............

3. दुस-या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............ जिल्हा ............ राज्य ............

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) .............. Rank .............. No. .............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .............................. (3) Transferred to P. S. .............................. District .............................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.

संपूर्ण नाव Name ............ सीमा सकुंडे
पदनाम Rank ............ पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र.
Posting ला.प्र.वि. मुंबई
Coding No. of I. O. ............

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ............
1. Date and time of submitted to the Court

प्रत. 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

यातील फिर्यादी श्री. संजय बनाजी काळे, वय-49 वर्षे, व्य. मुकादम (बृ.मुं.म. एच/पुर्व विभाग), सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक कार्यालय, वाकोला, सांताक्रुज (पु), मुंबई) रा.ठी. खोली नं. 1212, 12 वा माळा, शास्त्रीनगर को. ऑप. हौ. सोसा, बांद्रा (पुर्व), मुंबई 400051. मो.नं. 9702642873 यांचा सविस्तर जबाब स्वतंत्र कागदावर टंकलिखित केला असून तोच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात यावी.

समक्ष
[signature]
(सीमा साळुंके)
पोलीस निरीक्षक-
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

Sanjay Kale

फिर्याद दि. २१/०३/२०१८

श्री. संजय धनाजी काळे, वय ४९ वर्षे, धंदा– मुकादम (घन कचरा व्यवस्थापन विभाग, एच/पुर्व विभाग, सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक कार्यालय, सांताक्रुझ (पु),मुंबई), राठि– खोली नं.१२१२, १२ वा माळा, शास्त्रीनगर को. ऑप. हौ. सोसायटी, बांद्रा (पुर्व), मुंबई नं. ४०००५१, मो नं. ९७०२६४२८७३.

..................

मी वरील प्रमाणे असुन, वर नमुद ठिकाणी माझे जन्मापासुन राहत आहे. माझे सोबत माझे वडील श्री. धनाजी वामन काळे, वय ६८ वर्षे, आई सौ. कमल धनाजी काळे, ६६ वर्षे व दोन मुले व तीन मुली असा परिवार आहे. माझे वडील केंद्र सरकारी कर्मचारी म्हणून सेवानिवृत्त झाले असून, ते सध्या घरीच असतात. मी स्वत: घन कचरा व्यवस्थापन विभागात मुकादम म्हणून नोकरी करून माझा व माइया कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.

मी, सन–१९९० मध्ये मुंबई महानगरपालीकेत संमार्जक (स्वच्छक) पदावर भरती झालो असून, दिनांक ०१/०९/२०१५ पासून सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक, घन कचरा व्यवस्थापक, एच/पुर्व, शांतीनगर इंडस्ट्रीयल, वाकोला, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई येथे मुकादम म्हणून कार्यरत आहे.

मी, दिनांक १६/०२/२०१८ रोजी माझी वेतन निश्चिती प्रपत्र व वार्षिक वेतनवाढ मिळणेसंदर्भात मा. प्रशासकीय अधिकारी/सहा.मुख्य पर्यवेक्षक, एच/पुर्व विभाग, घ.क.व्य. खाते कार्यालय, सांताक्रुझ (पु), मुंबई यांचे नांवे विनंती अर्ज सादर केला होता. तसेच माझे सोबत काम करणारे श्री. दुधाभाई केशवभाई झाला, वय ४५ वर्षे, धंदा–मुकादम ( सहा.मुख्य पर्यवेक्षक, आस्थापना विभाग, एच/पुर्व, घ.क.व्य.खाते कार्यालय, सांताक्रुझ (पु), मुंबई) यांनी देखील त्याच कारणाकरीता विनंती अर्ज सादर केला होता. आमचे दोघांचे विनंती अर्ज आम्हीं आमच्या कार्यालयात सादर केल्यानंतर, सदरचे अर्ज प्रशासकीय अधिकारी श्रीमती परांजपे मॅडम यांचेमार्फतीने संबंधीत लिपीक मांडवकर यांना मार्गस्थ झाले होते. त्यापैकी माझा अर्ज सेवाभिलेखाद्वारे तपासणी करून वेतननिश्चीती प्रमाणपत्र तयार करण्यासाठी मुख्य लिपीक, सेवाभिलेख, एच/पश्चिम,घ.क.व्य.,धर्मशाळा कार्यालय, बांद्रा (प), मुंबई या कार्यालयास दिनांक ०६/०३/२०१८ रोजी पाठविण्यात आल्याची मला माहिती मिळाली. सदर ठिकाणी मुख्य लिपीक म्हणून अतिरिक्त कार्यभार सांभाळत असलेले प्रशांत नरसिंह किणी, वय ४१ वर्षे यांची मी आणि माझे सहकारी श्री. दुधाभाई केशवभाई झाला, वय ४५ वर्षे यांनी त्याच दिवशी समक्ष भेट घेतली व आमच्या विनंती अर्जाबाबत त्यांना विचारणा केली असता, त्यांनी आम्हांला सांगितले की, ''ते सदर ठिकाणी अतिरिक्त कार्यभार म्हणून काम पहात असून, सदरचा अर्ज पुढील कार्यवाहीकरीता ते स्वत: लिपीक म्हणून कार्यरत असलेल्या सहा.मुख्य पर्यवेक्षक, आस्थापना विभाग, एच/पुर्व, घ.क.व्य.खाते कार्यालय, सांताक्रुझ (पु), मुंबई येथील कार्यालयात समक्ष येवून भेटणे''.

मी आणि माझे सहकारी श्री. दुधाभाई केशवभाई झाला, वय ४५ वर्षे, धंदा–मुकादम हे सहा.मुख्य पर्यवेक्षक, आस्थापना विभाग, एच/पुर्व, घ.क.व्य.खाते कार्यालय, सांताक्रुझ (पु), मुंबई या कार्यालयातच काम करीत असल्याने त्यांना मी सदर ठिकाणी भेटण्याचे कबुल केले.

दिनांक १६/०३/२०१८ रोजी सकाळी ११.१५ वा. चे सुमारास मी आणि माझे सहाकारी श्री. दुधाभाई केशवभाई झाला, वय ४५ वर्षे असे दोघेजण आमच्या विनंती अर्जावर झालेल्या पुढील कार्यवाहीची माहिती घेण्याकरीता आम्हीं कार्यरत असलेल्या सहा.मुख्य पर्यवेक्षक, आस्थापना विभाग, एच/पुर्व, घ.क.व्य.खाते कार्यालय, सांताक्रुझ (पु), मुंबई येथील तळमजल्यावरील सेवाभिलेख कार्यालयात जावून मुख्य लिपीक श्री. प्रशांत नरसिंह किणी, वय ४१ वर्षे, यांना समक्ष भेटलो असता, त्यांनी मला माझे शासकीय कामकाज

PI

....२/–

करण्याकरीता रू.२,०००/— रोख रक्कम लाचेची आणि माझे सहकारी श्री. दुधाभाई केशवभाई झाला, वय ४५ वर्षे यांना त्यांचे शासकीय कामकाज करण्याकरीता रू.३,०००/— रोख रक्कम लाचेची मागणी केली. मला मुख्य लिपीक श्री. प्रशांत नरसिंह किणी, यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी त्याच दिवशी दिनांक १६/०३/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथील कार्यालयात माझ्या मोटार सायकल ने वरळी येथील कार्यालयात गेलो व कर्तव्यावर असलेल्या पोलीस निरीक्षक सीमा सकुंडे यांचेकडे सविस्तर तक्रार सांगितली व तसा तक्रार अर्ज पोलीस निरीक्षक सीमा सकुंडे यांचेकडे माझे स्वहस्ताक्षात लिहुन माझी सही करून दिला. पोलीस निरीक्षक सीमा सकुंडे यांनी मला सदर तक्रारीची पडताळणी दोन शासकीय पंचासमक्ष करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. पोलीस निरीक्षक सीमा सकुंडे यांनी दोन सरकारी पंचाना बोलावून त्यांची व माझी ओळख करुन दिली व पंचांना सदरील तक्रार अर्जाबाबत माहीती दिली व पंचांना सदरील माझा अर्ज वाचण्यास दिला. पंचांनी तो वाचुन पाहीला व मी पंचांना सांगीतलेल्या हकीकत प्रमाणे बरोबर असल्याने पंचांनी सदरील तक्रार अर्जावर सहया केल्या. त्यानंतर माझे तक्रार अर्जावर पोलीस निरीक्षक सीमा सकुंडे यांनी स्वत: समक्ष म्हणुन सही केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक सीमा सकुंडे यांनी पोलीस अंमलदाराचे मदतीने डिजीटल व्हाईल रेकॉर्डमध्ये माझे व पंचांचे वक्तव्य रेकॉर्डींग केले.

मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासंदर्भात पोलीस निरीक्षक सीमा सकुंडे यांनी मला तसेच पंचांना व पथकाला सुचना दिल्या. त्यानुसार त्याच दिवशी दिनांक १६/०३/२०१८ रोजी दुपारी ४.४५ वाजता वरळी येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयातुन पोलीस निरीक्षक सीमा सकुंडे, स.पो.आ.तेंडुलकर व स्टाफ तसेच मी आणि पंच असे वेगवेगळया दोन शासकीय वहानातून निघुन सी लिंक मार्गे सहा.मुख्य पर्यवेक्षक, आस्थापना विभाग, एच/पुर्व, घ.क.व्य.खाते कार्यालय, सांताक्रुझ (पु), मुंबईचे जवळच असलेल्या हॉटेल हयात येथे वाहन थांबविले. सदर ठिकाणी पो.नि.सकुंडे यांनी वाहनामध्येच पंचांना व मला दिलेल्या सुचनांची उजळणी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक सीमा सकुंडे यांनी त्यांचे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉडर चालू केला व नमुद व्हाईस रेकॉर्डर पोलीस अंमलदार गायकवाड यांचे मदतीने माझे शर्टाचे आतील बनीयनला लावला व त्यानी दिलेल्या सुचनांप्रमाणे मी स्वत: व पंच क्र. १ श्री. हरीबा सोपानगीर गिरी, वय ४१ वर्षे यांचेसह पायी चालत सहा.मुख्य पर्यवेक्षक, आस्थापना विभाग, एच/पुर्व, घ.क.व्य.खाते कार्यालय, सांताक्रुझ (पु), मुंबई येथील तळमजल्यावरील सेवाभिलेख, एच/पुर्व येथे जावून मुख्य लिपीक श्री. प्रशांत नरसिंह किणी, वय ४१ वर्षे यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मला सांगीतले की, 'पे फिक्सेशन केल्याशिवाय थकबाकी मिळणार नाही. सदर फिक्सेशन करून थकबाकी काढण्यासाठी तीन हजार रूपये दयावे लागतील'' त्यावर मी त्यांना अडीच हजार रूपयामध्ये माझे काम करून देण्याची विनंती केली असता, लोकसेवकाने त्यामध्ये काहीही करता येणार नसून त्यातील एक हजार रूपये ऑडीटरला दयावे लागतील असे सांगून, माझी वेतनवाढ निश्चित करण्यासाठी श्री. प्रशांत किणी यांनी माझ्याकडे रू. ३,०००/— लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच क्र. १ श्री. हरीबा सोपानगीर गिरी, वय ४१ वर्षे असे हॉटेल हयातचे जवळ थांबलेल्या ला.प्र.वि.पथकाचे वाहनांजवळ आलो. तेथे पोलीस निरीक्षक सीमा सकुंडे यांनी पोलीस अंमलदार गायकवाड यांचे मदतीने माझ्या जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉडर काढुन घेतला व बंद केला. त्यांनी माझे व लोकसेवक मुख्य लिपीक श्री.प्रशांत नरसिंह किणी, वय ४१ वर्षे यांचेमध्ये झालेले संभाषणाबाबत पंच क्र.१ गिरी व मला विचारपुस करून डिजीटल रेकॉर्डरमध्ये रेकॉर्डींग झालेले संभाषण ऐकले व पडताळणी कारवाई पुर्ण केली. मुख्य लिपीक श्री. प्रशांत नरसिंह किणी यांनी माझ्या

फिर्यादी श्री. संजय धनाजी काळे, वय ४९ वर्षे यांचा दि.२१/०३/२०१८ रोजीचा फिर्यादी जबाब पुढे चालू....

सरकारी कामाकरीता रू. ३,०००/— रोख रक्कमेची लाच म्हणून मागीतल्याची खात्री झाली. मुख्य लिपीक श्री. प्रशांत नरसिंह किणी यांचेकडे एच/पश्चिम वॉर्ड, बांद्रा (प), मुंबई येथील देखील अतिरिक्त कार्यभार असल्याने ते एक दिवसाआड सहा. मुख्य पर्यवेक्षक, आस्थापना विभाग, एच/पुर्व, घ.क.व्य.खाते कार्यालय, सांताक्रुझ (पु), मुंबई येथील कार्यालयात हजर असतात. तसेच सोमवार दिनांक १९/०३/२०१८ रोजी मी माझ्या खाजगी कामासाठी पुण्याला जाणार असल्याने तसेच मुख्य लिपीक श्री. प्रशांत नरसिंह किणी हे बुधवार दिनांक २१/०३/२०१८ रोजी एच/पुर्व, घ.क.व्य.खाते कार्यालय येथे उपस्थित रहाणार असल्याने माझ्या विनंतीनुसार मुख्य लिपीक श्री. प्रशांत किणी यांना त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम आज रोजी देण्याकरीता भेटण्याचे ठरले.

त्यानुसार आज दिनांक २१/०३/२०१८ रोजी दुपारी २.०० वा.चे सुमारास माझे कर्तव्य संपल्यानंतर पोलीस निरीक्षक सीमा सकुंडे व ला.प्र.वि. पथकाने मुंबई विद्यापीठ, कालीना, सांताक्रुझ, मुंबई येथे पुढील कार्यवाहीकरीता बोलाविल्यानुसार मी सदर ठिकाणी हजर झालो. त्यावेळी तेथे पो.नि.सीमा सकुंडे व पथक उपस्थित होते. मी माझ्याकडील रू. ३,०००/— (भारतीय चलनातील रू. २,०००/—ची एक आणि रू. ५००/—च्या दोन नोटा) पो.नि.सकुंडे यांचे ताब्यात दिल्या. पो.नि. सकुंडे यांनी पंचांसमक्ष मी दिलेल्या रू. ३,०००/— रोख रक्कमेच्या नोटांवरील नंबर कागदावर लिहून घेतले व त्यावर पंचांनी व पो.नि. सकुंडे यांनी सहया केल्या. तद्नंतर पो.नि. सकुंडे यांनी पुढील कारवाईच्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. सकुंडे त्यांचे जवळील सीलबंद असलेला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर पंच व माझ्या समक्ष सील खोलून, पोलीस अंमलदार गायकवाड यांचे मदतीने नमुद व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन पेन्सिल सेल टाकून माझे व पंचांचे वक्तव्य रेकॉर्डींग केले. ला.प्र.वि. पथकातील अंमलदाराने पंचांना व मला अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून मी दिलेल्या सदर नोटांवर सफेद रंगाची पावडर लावली व लाचेची रू. ३,०००/— रोख रक्कम मी माझ्या शर्टाच्या डाव्या खिश्यात ठेवली. त्यानंतर पो.नि.सकुंडे यांनी पोलीस अंमलदार गायकवाड यांचे मदतीने व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टाचे आतील बनीयनला लावला व त्यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे मी व पंच क्र. १ श्री. हरीबा सोपानगीर गिरी, यांचेसह वर नमुद सहा. मुख्य पर्यवेक्षक, आस्थापना विभाग, एच/पुर्व, घ.क.व्य.खाते कार्यालय, सांताक्रुझ (पु), मुंबई येथील तळमजल्यावरील सेवाभिलेख, एच/पुर्व विभागामधील मुख्य लिपीक श्री. प्रशांत नरसिंह किणी यांची समक्ष भेट घेतली व त्यांना सांगितले की, "तुम्हीं सांगितल्याप्रमाणे मी रू.३,०००/— रोख रक्कम घेवून आलो आहे" त्यावेळी मुख्य लिपीक श्री.प्रशांत नरसिंह किणी, यांनी मला थोडावेळ बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानुसार मी व पंच क्र.१ श्री. हरीबा सोपानगीर गिरी, यांचेसह कार्यालयाचे बाहेर थांबलो. तदनंतर अंदाजे पंधरा मिनीटांनी मुख्य लिपीक श्री.प्रशांत नरसिंह किणी, हे कार्यालयाचे बाहेरील इमारतीचे प्रवेशद्वाराजवळ आले व त्यांनी माझ्याकडे हाताने इशारा करून लाचेच्या पैशाची मागणी केली व म्हणाले की, "पैसे कागदामध्ये गुंडाळून पहिल्या मजल्यावरील लिपीक मांडवकर यांना दे" त्यावेळी मी त्यांना सांगितले की, "पैशाची मागणी आपण केलेली आहे" असे म्हणाल्यानंतर मुख्य लिपीक श्री. प्रशांत नरसिंह किणी, यांनी पुन्हा हाताने इशारा करून त्यांना पैसे देण्यास सांगितल्यावरून, त्यांनी मागणी केल्यानुसार मी त्यांना रू. ३,०००/— रोख रक्कम दिली. सदरची रक्कम मुख्य लिपीक श्री. प्रशांत नरसिंह किणी, यांनी पंच क्र.१ श्री. हरीबा सोपानगीर गिरी, यांचे समक्ष त्यांच्या डाव्या हाताने स्विकारल्यानंतर त्यांनी त्यातील रू. ५००/— काढून मला

परत केले व उर्वरीत रू.२,५००/— रोख रक्कम ही त्यांच्या पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवली व ते त्यांचे तळमजल्यावरील कार्यालयात जावून बसले. त्यानंतर मी, सदर कार्यालयातून बाहेर येवून ठरल्याप्रमाणे माझ्याकडील कंगवा डोक्याच्या केसांवरून वारंवार फिरवून इशारा केला. त्यावेळी कार्यालयाचे बाहेर थांबलेले पोलीस निरीक्षक सीमा सकुंडे व त्यांचे पथकाने लागलीच लोकसेवक मुख्य लिपीक श्री. प्रशांत नरसिंह किणी, यास ताब्यात घेतले. तेव्हा पंचांसमक्ष त्यांची झडती घेतली असता, त्यांचे पॅन्टच्या डाव्या खिशात मी दिलेली लाचेची रोख रक्कम रू.२,५००/— मिळुन आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक सीमा सकुंडे यांनी मला लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, माझ्याकडे लोकसेवकाने परत दिलेले रू. ५००/— रोख रक्कम असल्याचे सांगितले. त्यावेळी लाचेची रू.२,५००/— आणि माझ्याकडील रू.५००/— या रक्कमा पुढील तपासकामी पो. नि.सकुंडे यांनी स्वत:च्या ताब्यात घेतल्या.

तरी सहा. मुख्य पर्यवेक्षक, आस्थापना विभाग, एच/पुर्व, घ.क.व्य.खाते कार्यालय, सांताक्रुझ (पु), मुंबई येथील तळमजल्यावरील सेवाभिलेख, एच/पुर्व विभागामधील मुख्य लिपीक श्री. प्रशांत नरसिंह किणी, वय ४१ वर्षे यांनी माझे वेतन निश्‍चिती प्रपत्र व वार्षिक वेतनवाढीबाबत केलेल्या विनंती अर्जाची कार्यवाही पुर्ण करण्याकरीता दिनांक १६/०३/२०१८ रोजी माझेकडे रू. ३,०००/— लाचेची मागणी करून, आज दिनांक २१/०३/२०१८ रोजी तडजोडीअंती रू. २,५००/— लाच स्विकारण्याचे मान्य करून स्विकारली म्हणुन माझी मुख्य लिपीक श्री. प्रशांत नरसिंह किणी, वय ४१ वर्षे यांचेविरूध्द तक्रार असुन, त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझा जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मी स्वत: वाचून पाहिला असून, तो मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

(सीमा सकुंडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.